# प्रेस नोट

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक – १७/०१/२०१८

## वानवडी पोलीसांकडुन १ घरफोडी व ४ मोटार सायकली जप्त

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी इसम नामे **(१) सुनिल ऊर्फ चपट्या लक्ष्मण धांडे वय १९ वर्षे रा.सर्वे नंबर ४०/२ स्वीटहोम समोर चर्चजवळ कृष्णानगर महंमदवाडी पुणे, (२) किरण ऊर्फ बगळ्या सुरेश गायकवाड वय १९ वर्षे रा.सर्वे नंबर ४०/२ स्वीटहोम समोर चर्चजवळ कृष्णानगर महंमदवाडी पुणे** यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन वानवडी पोलीस ठाणेकडील ०१ वाहनचोरी व ०१ घरफोडी, तसेच कोंढवा, येरवडा, लोणीकंद पोलीस ठाणेकडील प्रत्येकी ०१ वाहन चोरी असे एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

वानवडी पोलीस ठाणेकडील पो.शि.८७८७ नवनाथ खताळ यांना विश्वसनीय माहीती मिळाली की, इसम नामे (१) सुनिल ऊर्फ चपट्या लक्ष्मण धांडे (२) किरण ऊर्फ बगळ्या सुरेश गायकवाड यांनी पुणे शहर व पुणे ग्रामीण परिसरातुन घरफोडी व मोटार सायकलींची चोरी केलेली असुन ते सध्या रामटेकडी एम.आय.डी.सी. कचरा डेपो परिसरात फिरत आहेत. अशी माहीती मिळाली त्या अनुषंगाने वानवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी रामटेकडी एम.आय.डी.सी. कचरा डेपो परिसरात सापळा लावुन त्यांना हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकलसह ताब्यात घेवुन त्यांचेकडे केलेल्या तपासात ते वापरत असलेली मोटार सायकल ही वानवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर १२/२०१८ भा.दं.वि.कलम ३७९ मधील चोरीची असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपीतांकडे सखोल तपास करता त्यांनी वानवडी, कोंढवा, येरवडा, लोणीकंद परिसरातुन घरफोडी मोटार सायकलींची चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याप्रमाणे ४ मोटार सायकली व १ घर्फोडी असा एकुण १,६७,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त श्री दिपक साकोरे सो, परिमंडळ-४ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री मिलींद पाटील सो, वानवडी विभाग पुणे शहर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सयाजी गवारे सो, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक, श्री अजय म्हेत्रे, पो.ना.निसार खान, पो.ना.संभाजी देवीकर, पो.शि.योगेश गायकवाड, पो.शि.नासीर देशमुख, पो.शि.अनुप सांगळे यांच्या पथकाने केली.